अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १६९ ■ शुक्रवार दि.७ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 169 ■ Friday Dt. 7 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

## महावितरणच्या दोन अभियंत्यासह कंत्राटदारावर गुन्हा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील पुस येथील शेतातील ३३ के.व्ही.ची लाईन स्थलांतरीत करण्यासाठी महाविरणचे उपअभियंता व कनिष्ठ अभियंता व कंत्राटदार यांनी दोन लाख रूपयांची लाच मागणी केली व फसवणूक केल्या प्रकरणी अतिरिक्त सत्र न्यायधीस एस.जे. घरत यांच्या आदेशावरुण तिघा जणांविरूद्ध बर्दापुर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. पुसे येथील शेतकरी श्रीकर त्रिंबकराव फड यांच्या पुस येथील शेतात पेट्रोल पंप मंजूर झाला आहे. या ठिकाणी असणारी ३३ के.व्ही.ची लाईन स्थलांतरीत करण्यात यावी. यासाठी फड यांनी महाविरणचे उपअभियंता सतिष नामदेवराव कानडे, कनिष्ठ अभियंता सतिष अप्पाराव गुडे व महाविरणचे कंत्राटदार बळवंत आण्णासाहेब गंगणे रा. अंबाजोगाई या तिघांनी संगणमत करून ३३ के.व्ही.ची लाईन स्थलांतरीत करण्यासाठी दोन लाख रूपयांची लाच मागितली. तसेच ही लाईन पूर्णपणे न हटवता दीड मीटर जमीन क्षेत्रात कायम ठेवली.

## बारा वर्षाचा मुलगा पिसेगांव येथून बेपत्ता; गुन्हा दाखल

**केज । प्रतिनिधी**

दि.६ मार्च २०२५ गुरुवार रोजी केज तालुक्या तील पिसेगाव येथून सायंकाळी ६:०० वाजेच्या सुमारास १२ वर्षाचा मुलगा बेपत्ता झाला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की,सम्यक राहुल जाधव वय १२ वर्षे राहणार शिवनी खदान तालुका जिल्हा अकोला हल्ली मुक्काम पिसेगाव तालुका केज जिल्हा बीड हा मुलगा गुरुवारी सायंकाळी ६:०० वाजेच्या सुमारास पिसेगाव येथून बेपत्ता झाला आहे. सदर प्रकरणात केज पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली असून स्थानिक पोलीस सदर मुलाचा शोध घेत आहेत. सदर मुलाबाबत काही एक माहिति मिळाल्यास अथवा तो मिळून आल्यास पोलीस ठाणे केज येथे माहिती देण्यात यावी.संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक श्री.वैभव पाटील प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे केज यांनी केले आहे.

# खोक्याच्या आकांनी खोक्यावर एमपीडी, मकोकावर सभागृहात प्रश्न उपस्थित करावा?

■ आ. सुरेश धसांनी खोक्यावर मकोका व एमपीडी अंतर्गत कारवाईसाठी अधिवेशनात उठवावा. नागरिकांमधून मागणी तरच आमदार स्वच्छ प्रतिमेचे असतील?

■ आ. धनंजय मुंडे नंतर आ. सुरेश धस आष्टीचे आका नागरिकांतून चर्चा रंग लागल्या.?



■ अधिवेशन चालू असताना विधानसभेमध्ये सुरेश धसाने जर आवाज उठवला तर सुरेश धस स्वच्छ प्रतिमेचे जर आवाज नाही उठवला तर आ. सुरेश धस जातीयवादी चेहरा म्हणून ओळखले जाणार?

■ हुकूम मेरे आका सुरेश धसाचे खोक्यामुळं अनेक गुंड बाहेर पडणार पोलीस रेकॉर्डवर येणार

■ सतीश भोसले उर्फ खोक्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना सुरेश धस यांचे रेकॉर्डिंग वायरल खोक्या मुळं आ. सुरेश धस अडचणीत.?

■ आ. सुरेश धस यांनी मान्य केलं खोक्या माझा कार्यकर्ता पण त्याच्यावरती गुन्हा दाखल झाला पाहिजे आ. धस यांची भावना!

■ बीडच्या खोक्या भाईला हरीण अन् मोरांच्या शिकारीचा शौक, विरोध करणाऱ्याचे ८ दात पाडले, जबडा मोडला. अनेक टीव्ही चॅनेल माध्यमांवरती खोक्या विरुद्ध बातम्यांचा पाऊस

■ सतीश भोसले याने दिलीप ढाकणे आणि त्यांच्या मुलाला बॅटने मारहाण करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. दिलीप ढाकणे यांच्या तोंडाचा जबडा फ्रॅक्चर

■ बीडच्या खोक्या भाईला हरीण अन् मोरांच्या शिकारीचा शौक, विरोध करणाऱ्याचे ८ दात पाडले, जबडा तोडला

## हुकूम मेरे 'आका'वर आ.सुरेश धसांनी खोक्याच्या व्हिडिओमुळे अनेक गुंड पोलीस रेकॉर्डवर येणार


**बीड । प्रतिनिधी**

**आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्याशी जवळीक असलेल्या सतीश थोरात उर्फ खोक्या भाईने शिरुर गावातील दिलीप ढाकणे आणि त्यांचा मुलगा महेश ढाकणे यांना मारहाण केल्याचा प्रकार घडला होता. सतीश भोसले याने दिलीप ढाकणे आणि त्यांच्या मुलाला बेदम मारहाण केली होती. सतीश भोसले हा भाजपचा पदाधिकारी आहे. प्रचंड पैसा आणि दहशतीच्या जोरावर खोक्या भाईने या परिसरात आपला दबदबा निर्माण केला होता. खोक्या भाईच्या या दहशतीच्या थरारक कहाण्या आता एक–एक करुन बाहेर येत आहेत.**

सतीश भोसले उर्फ खोक्या भाईला हरीण आणि मोरांच्या शिकारीचा शौक होता. खोक्याने आतापर्यंत साधारण २०० पेक्षा जास्त हरिणांना मारल्याचं आजूबाजूच्या गावचे लोक सांगतात. याशिवाय डोंगरात वागूर (पक्षी पकडण्याचे जाळे) लावून कित्येक मोरही खाल्ले आहेत. आठ दिवसांपूर्वी सतीश भोसले आणि त्याचे सहकारी दिलीप ढाकणे यांच्या शेतात हरणं पकडत होते. त्यावेळी दिलीप ढाकणे यांनी त्यांना हरणं पकडण्यास मज्जाव केला. तेव्हा खोक्या भाई आणि त्याच्या सहकाऱ्यांनी दिलीप ढाकणे आणि त्यांच्या मुलाला अमानुष मारहाण केली.



यामध्ये दिलीप ढाकणे यांचे ८ दात पडले आहेत आणि त्यांचा जबडा फ्रॅक्चर झाला आहे. ढाकणे यांच्या मुलाचाही पाय फ्रॅक्चर झाला असून त्याला लंगडत चालावे लागत आहे. त्याच्या अंगावर वारही आहेत. दिलीप ढाकणे आणि त्यांचा मुलगा १९ फेब्रुवारीला पोलिसांकडे तक्रार करण्यासाठी गेले तेव्हा शिरूर पोलिस ठाण्यात एपीआय गणेश धोक्रट यांनी त्यांना हाकलून लावले, असा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. सतीश भोसले उर्फ खोक्या भाई याचा 'आका' सुरेश धस हेच आहेत. त्यामुळे पोलिसांना आता आकावर गुन्हा दाखल केला नाही तर आम्ही शिरुर बंद करुन आमरण उपोषणाला बसू, असा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे. तर बीड जिल्ह्यातील जनता आता स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हस्ते नंतर सुरेश धस यांनी उठवलेला आवाज आणि धनंजय मुंडे यांना टार्गेट करत त्यांचा राजीनामा घेतला परंतु वाल्मीक करा सुद्धा नको कराव ाउ अंतर्गत कारवाईसाठी आता पात्र आहे तर मग खोक्या पात्र आहे का नाही हे आमदार सुरेश दत्ताने ठरवावे कारण गुन्हेगारीच्या भाषेमध्ये सतीश भोसले ही सुरेश आणि असल्याची चर्चा नागरिकांमधून होत आहे त्यामुळे अधिवेशन चालू असताना विधानसभेमध्ये मक्कोका व एमपीडी अंतर्गत कारवाईची मागणी आ. सुरेश धस यांनी करावी अशी मागणी मागणी नागरिकांकडून होत आहे.



### सतीश भोसलेला अटक कधी?

सतीश भोसले याच्याकडून दिलीप ढाकणे यांना मारहाण होतानाचे व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्यानंतर खोक्या भाईला अटक कधी होणार, असा प्रश्न विचारला जात आहे. बीड पोलिसांनी खोक्या भाईला अटक करण्यासाठी दोन पथकं स्थापन केली आहेत. सतीश भोसलेचे दोन प्रकारच्या मारहाणीचे व्हीडिओ आहेत. शिरुर पोलीस ठाण्यात सतीश भोसले याच्यावर दोन गुन्हे दाखल झाले आहेत. मात्र, त्याला अटक झालेली नाही. मात्र, आम्ही त्याला पकडण्यासाठी दोन पथकं तयार केली आहेत, असे बीड पोलिसांकडून सांगण्यात आले.


" अंगावर सोनं, कारमध्ये नोटांची बंडलं, डोळ्यावर गॉगल! बीडमध्ये अमानुष मारहाण करणाऱ्या भाजप पदाधिकारी सतीश भोसलेचे फोटो व्हायरल

# मांगवीरांचा आझाद मैदानावर विराट मोर्चा

## अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरण करण्याची केली मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

मातंग व तत्सम तळातील जात समूहातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी येत्या जून महिन्यापूर्वी महाराष्ट्रात अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरण करण्याची मागणी मांगवीर महामोर्चाद्वारे करण्यात आली आहे. लाल सेना व दलित महासंघ यांच्या पुढाकारातून एकत्र येऊन महाराष्ट्रातील २७ संघटनांनी ५ मार्च रोजी शहीद संजय ताकतोडे यांच्या स्मृतिदिनी आझाद मैदान मुंबई येथे मांगवीर महामोर्चा काढला होता. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो मांगवीर आझाद मैदानावर महामोर्चात सहभागी झाले होते. महामोर्चाची दखल घेऊन सरकारच्या वतीने जलसंपदा मंत्री नामदार गिरीश महाजन यांना आझाद मैदानावर येऊन निवेदन स्वीकारले काय जून पर्यंत यावर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. याप्रसंगी मंत्री महोदय यांच्या समवेत आमदार अमित गोरखे, आमदार सुनील कांबळे, आमदार देशमुख, आमदार महादेव जानकर आदी मान्यवर उपस्थित होते.




मोर्चेकर यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अनुसूचित जातीच्या आरक्षणाचा लाभ एक दोन जाती वगळता मातंग सह अनेक जातींना मिळत नसल्याने सर्व वंचित जातींना आरक्षणाचा समान लाभ मिळावा यासाठी मागील दोन वर्षांपासून मातंग समाज सातत्याने आंदोलन करीत आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दविंदरसिंह वि दि स्टेट ऑफ पंजाब या केस मध्ये अनुसूचित जातीतील सर्व जातींना आरक्षणाचा समान लाभ मिळण्याच्या दृष्टीने अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याचा निर्णय दिला आहे. त्या अनुषंगाने आणि मातंग समाजाची आरक्षण उपवर्गीकरणासाठीची आग्रही मागणी लक्षात घेऊन महायुती सरकारने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी अनुसूचित जातीचे आरक्षण उपवर्गीकरणाचे प्रारुप निश्चित करण्यासाठी न्यायमूर्ती अनंत बदर समिती नियुक्त केली होती. त्यामुळे मातंग व तत्सम सर्व वंचित जातींनी मागील विधानसभेत महायुतीला भरभरून मतदान केले आहे. परंतु ५ महिणे होऊनही या न्या. बदर समितीचे काम अतिशय संथगतीने सुरू आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर हरियाणा सरकारने नोव्हेंबर २०२४ पासून आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी सुरू केली आहे तर दक्षिणेतील आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटक राज्यांनी या महिन्यातील अर्थ संकल्पीय अधिवेशनात अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणाचे विधेयक मंजूर करून लागलीच अंमलबजावणी करण्याची तयारी सुरु केली आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. या पुरोगामी राज्यात अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण करून सर्व जातींना सामाजिक न्याय देण्याची कार्यवाही सर्वात अगोदर सुरू होणे अपेक्षित होते. परंतु दुर्दैवाने महाराष्ट्र राज्य हे सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेत खूप मागे आहे.

▶ पान २ वर

# संतोष देशमुखांच्या पोस्टमॉर्टम अहवालात धक्कादायक खुलासे

## सर्व अंगावर खोलपर्यंत जखमा; आणखी एक व्हिडिओ आला समोर

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख चांच्या हत्येला अडीच महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटला असतानाही अजूनही एक आरोपी फरार आहे. त्यांच्या हत्येचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतरही राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. वा प्रकरणात पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले असून, वाल्मिक कराड याला या प्रकरणातील प्रमुख आरोपी म्हणून नमूद करण्यात आले आहे. हे सर्व सुरू असतानाच सीआयडीच्या तपासात संतोष देशमुख यांना अमानुषपणे संताप व्यक्त होत आहे. नागरिक आणि मारहाण करतानाचे फोटो आणि व्हिडीओ सापडल्यानंतर आता त्यांचा पोस्टमॉर्टम रिपोर्ट समोर आला आहे.



बीडमधील सरपंच संतोष देशमुख बांच्या हत्येच्या भीषणतेचे स्पष्ट चित्र पोस्टमार्टम (अच्) अहवालातून समोर आले आहे. या अहवालानुसार, त्यांना अमानुषपणे मारहाण करण्यात आली होती, ज्यामुळे त्यांच्या संपूर्ण शरीराचर गंभीर जखमा आवळल्या आहेत. हनुवटी, कपाळ आणि दोन्ही गालांवर खोल जखमांच्या खुणा होत्या. पोटावर बेदम मारहाण, त्यामुळे रक्तस्राव आला होता नाकातून रक्तत्वाच आणि छाती, गळ्यावर गंभीर जखमा होत्या दोन्ही बरगड्यांवर जवर मारहाण झाल्याचे दिसत होते. डाव्या खांद्यावर तीन्न जखमा, दंड, कोपर, मनगट आणि हाताच्या मुठींचर गंभीर जखमा होत्या. जखमांमुळे त्वचेचा रंग काळा–निळा पडला होता संपूर्ण पाठ काळोनिली, झरीरातील रक्त साखळलेले होते. या अमानुष मारहाणीचा तपशील पोलिसांनी आरोपपत्रात नोंदवला असून, ही हत्या किती क्रूर पद्धतीने करण्यात आली होती, हेरी दाखवले आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येची तीव्रता समोर आल्याने महाराष्ट्रभर त्यांच्या समर्थकांनी आरोपींना फाशी द्याची किंवा तशीच शिक्षा व्हावी, अशी मागणी केली आहे.

या हत्येने कायद्याच्या आणि सामाजित्क सुरक्षिततेच्या प्रश्नांचर मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. आता न्यावालय आणि सरकार चाचर काय निर्णय घेते, वाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या अमानुषतेला सीमा उरली नाही, हे तपासातून समोर आलेल्या नव्या पुराव्यांवरून स्पष्ट होत आहे.

# गल्लीपासून दिल्लीपर्यंत पवनचक्की कंपन्यांना सरकारचे अभय

## पण पवनचक्की कंपन्यांच्या दडपशाहीमुळे पिडीत शेतकऱ्यांना वाली कोण?

बीड । प्रतिनिधी

पवनचक्की कंपन्यांना काही समाजकंटकांकडुन त्रास दिला जात असल्याची तक्रार ४६ पवनऊर्जा कंपन्यांची संघटना असलेल्या विपा ने केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांना केली आहे. त्या अनुषंगाने मुख्यमंत्री तथा गृहमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकारी बीड यांना पत्र पाठवून कंपन्यांना त्रास देणारांचा बंदोबस्त करावा असे लेखी आदेश दिले आहेत. पवनचक्की कंपन्यांना त्रास देणारे, खंडणीखोर यांच्यावर कठोर कारवाई व्हायला हवी मकोका अंतर्गत कारवाई व्हायला हवी याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. याचे स्वागतच आहे मात्र याचवेळी बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक, दडपशाही, शासनाची दिशाभूल करणे, पोलिस प्रशासनाच्या मदतीने खोटे गुन्हे दाखल करणे आदी घटना घडत असताना या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समितीचे स्थापना केलेली आहे. या समितींना पवन ऊर्जा प्रकल्पाचे निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे तसेच पवन ऊर्जा प्रकल्पांचे



निर्मिती होत असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यवहार व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे. पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे. जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या अनुषंगाने उद्धवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे. त्याचप्रमाणे शेतजमीन मालक ,शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवून प्रकल्प उभारण्यासाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहकार्य करणे. इत्यादी अधिकार दिलेले आहेत पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि पोलीस अधीक्षक बीड हे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे उपविभागीय स्तरावर सनियंत्रण समितीमध्ये उपविभाग अधिकारी अध्यक्ष तर तहसीलदार सचिव आहेत.

पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे जिल्हा प्रशासनाचे जाणीव करून दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात आवश्यक कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे.

# स्व.संतोष देशमुख, महादेव मुंडे व सोमनाथ सूर्यवंशी यांना परळी येथे कॅन्डल मार्च काढून सामूहिक श्रध्दांजली



परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख, परळीतील मयत महादेव मुंडे व परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांना परळी येथे बुधवार, दि ५ मार्च रोजी सामूहिक कॅन्डल मार्च काढून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या कँडल मार्च साठी परळी शहर व तालुक्यातील विविध संघटना, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोदवला. बुधवार दिनांक ५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता जिजामाता उद्यान येथील जिजाऊंच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून कॅण्डल मार्चला सुरुवात करण्यात आली. यानंतर राणी लक्ष्मीबाई टॉवर, मोंढा मार्केट, स्टेशन रोड मार्गे, बस स्टॅन्ड ते छत्रपती शिवाजी महाराज चौक अशा मार्गानी कँण्डल मार्च छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर सरपंच संतोष देशमुख, परळीतील मयत महादेव मुंडे व परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

सामूहिक श्रद्धांजली वाहण्यासाठी परळी शहरातील व तालुक्यातील सर्व महिला, पुरुष, तरुण लहान थोर मंडळींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागतिक ग्राहक दिनानिमित्त ग्राहकाची प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत : अनिल बोर्डे

गेवराई । प्रतिनिधी

१५ डिसेंबर हा जागतिक ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. त्यादिवशी जिल्ह्यातील सर्व कार्यालयातील ग्राहकाचे, शेतकरी ग्राहकाचे जिल्ह्या स्तरावरील, तालुका स्तरावरील तहसील कार्यालयातील शेतकरी ग्राहकाचे प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र चे उपाध्यक्ष तथा गेवराई ग्राहक पंचायत मार्गदर्शन केंद्र प्रमुख अनिल बोर्डे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केलेली आहे.



जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या माध्यमातून ग्राहकाच्या समस्या सोडविण्यासाठी हक्काचे बीड जिल्ह्यात ग्राहक संरक्षण कक्षाची स्थापना होणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन द्वारे मागणी केलेली आहे परंतु अद्याप पर्यंत जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना झालेली नाही तरी याबाबत १५ मार्च जागतिक ग्राहक दिनानिमित्त योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी या पत्रकाद्वारे करण्यात येत आहे. त्यामुळे विविध कार्यालयीन शासनाचे कामकाज शासन धोरणानुसार, गतिमान, पारदर्शक, मर्यादित कालावधी निपटारा होण्यासाठी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना होणे अत्यंत आवश्यक आहे याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करून कक्षाची स्थापना करावी अशी विनंती बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांच्यावतीने प्रसिद्धी पत्रका द्वारे करण्यात येत आहे.


# आंदोलनाचा इशारा देताच बीड- परळी राष्ट्रीय महामार्गावरील खड्डा बुजविला

वडवणी । प्रतिनिधी

बीड-परळी राष्ट्रीय महामार्गावरील बाहेगव्हाण ते मोरवड फाट्यादरम्यान असणारा मोठा जीवघेणा खड्डा तात्काळ बुजवून दुरुस्त करावा नसता तिव्र आंदोलन करण्याचा इशारा भाजपा तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत व इतरांनी लेखी निवेदनाद्वारे देताच सार्वजनिक बांधकाम उपक्रम विभागाने याची तात्काळ दखल घेऊन काल हा मोठा खड्डा बुजवून दुरुस्त केला आहे.

बीड परळी राष्ट्रीय महामार्गावर वडवणी ते तेलगाव दरम्यान मोठमोठे खड्डे पडलेले आहेत या महामार्गावरून दररोज हजारो वाहनधारक प्रवास करतात तरी यामध्ये वडवणी पासून काही अंतरावर असणाऱ्या बाहेगव्हाण ते मोरवड फाट्यादरम्यान हॉटेल त्रिमूर्तीच्या जवळ एक भला मोठा दक्षिण उत्तर लांबीचा व दोन फूट खोलीचा पूर्ण रोडवर खड्डा पडलेला होता. या खड्ड्यांमध्ये अनेक चारचाकी, दुचाकी वाहने आदळून अपघात घडून यामध्ये जखमी होण्याच्या घटना घडलेल्या होत्या तरी हा खड्डा मृत्यूचा सापळा बनलेला होता तरी या गंभीर गोष्टीकडे संबंधित विभाग तसेच कोणाचेही लक्ष नव्हते तरी याविषयी या महामार्गावरून दररोज ये-जा करणारे पुसरा येथील भाजपाचे तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत व इतरांनी तहसीलदार वडवणी, सार्वजनिक बांधकाम उपक्रम विभाग यांना दिनांक ५ मार्च रोजी तात्काळ खड्डा बुजवून दुरुस्त करावा नसता तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला होता तसेच याविषयीची बातम्या वर्तमानपत्रात प्रकाशित होताच सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग आली व त्यांनी याविषयी तात्काळ दखल घेऊन सदरील मोठा पडलेला खड्डा दुरुस्त करून बुजवून घेतला तरी यामुळे पुढील अपघात होऊन होणाऱ्या दुर्घटना टाळल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

# डोईफोडवाडीत सैनिकाचा सेवापूर्ती सन्मान



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील डोईफोडवाडी येथे सैनिक बप्पा साहेब बाबासाहेब डोईफोडे यांनी २१ वर्षे भारतीय सैन्यात सेवा करून निवृत्त झाल्याबद्दल त्यांचा डोईफोडवाडीने नागरी सत्कार केला याविषयी सविस्तर माहिती अशी की डोईफोडवाडी येथील एका सामान्य घरात जन्म झालेल्या बप्पा साहेबांनी २१ वर्षे भारतीय लष्करात देशाप्रती देशभक्ती दाखवून सेवा केली त्यांचा आदर्श इतर पुढच्या पिढीने घ्यावा म्हणून डोईफोडवाडीने त्यांच्या भव्यदिवे सत्काराचे आयोजन केले होते प्रथम ढोल ताशाच्या गजरात त्यांची गावभर मिरवणूक काढण्यात आली त्यानंतर त्यांना कार्यक्रम स्थळाकडे नेण्यात आले.

याप्रसंगी बोलत असताना प्राध्यापक तात्यासाहेब डोईफोडे म्हणाले की, सैनिकाच्या भरोशावर आपण बिनधास्त असतो बाप्पाने पुढे समाजाची सेवा कराव पुढे सत्काराला उत्तर देताना बाप्पा म्हणाले की आता आपल्याला चीन व पाकिस्तान यांना घाबरण्याची गरज नाही आपली सैन्यवस्था खंबीर आहे प्रत्येकाने देशाची निष्ठेने सेवा करावी आणि आपल्या गावाविषयी प्रेम असावे त्यानंतर राणा डोईफोडे जिल्हा परिषद सदस्य आपल्या अध्यक्षीय समारोपात बोलत असताना म्हणाले की पुढच्या पिढीने आदर्श घ्यावा म्हणून असे सत्काराचे कार्यक्रम आयोजित केले जातील शैक्षणिक विकास करण्यासाठी माझे शाळेकडे लक्ष असेल तसेच याप्रसंगी विक्रम डोईफोडे सर व सर्जेराव डोईफोडे भारतीय जनता पार्टीचे निष्ठावंत ज्येष्ठ कार्यकर्ते यांनी शुभेच्छा पर मार्गदर्शन केले कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरिक महिला पुरुष व तरुण मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व गावकऱ्यांनी सहकार्य केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा सरपंच प्राध्यापक तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी केली तर उपस्थितांचे आभार फुलचंद बाबासाहेब डोईफोडे ग्रामपंचायत सदस्य यांनी मानले अशी माहिती श्री तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.




आज सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ कार्यालयात ग्रुप ग्रामपंचायत ईरलाडुबा मजराचे सरपंच आसाराम बारकु क्षिरसागर यांनी सदिच्छा भेट दिली व सरपंचपदी ओपन आरक्षित जागेतून निवडणूक लढविली व ते निवडूनही आले त्याबद्दल सत्कार करताना संपादक दीपक थोरात, निवासी संपादक उद्धव आरे, अशोक वाघमारे, मोहन वाघमारे, परमेश्वर शिरसागर.

पान १ वरून...

## मांगवीरांचा आझाद मैदानावर विराट मोर्चा

इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही या शैक्षणिक वर्षापासून आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी सुरू होऊन मातंग व तत्सम वंचित जातींना न्याय मिळण्यासाठी सरकारने न्या. बदर समिती कडून दोन महिन्यांत आरक्षण उपवर्गीकरणाचा अहवाल घेऊन जून महिन्यापासून आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी सुरू करणे आवश्यक आहे. जर या शैक्षणिक वर्षापासून उपवर्गीकरणाची अंमलबजावणी सुरू केली नाही तर मातंग व तत्सम वंचित जातींचे खूप मोठे नुकसान होणार आहे. सरकार कडून या प्रक्रियेला विलंब होत असल्याने समस्त मातंग समाज आणि तत्सम जातींमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होत आहे. मांगवीर महामोर्चातून तो सरकारकडे व्यक्त करण्यात येत आहे. तेव्हा आपणांस नम्र विनंती आहे की, मातंग व तत्सम वंचित जातींना या जून महिन्यापासून आरक्षणाचा लाभ मिळून देऊन या वंचित जातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी येत्या जून महिन्यापासून अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी सुरू करावी. असे केल्यास मातंग व तत्सम सर्व वंचित जाती आपल्या कायम ऋणात राहतील.

: आमच्या मागण्या खालील प्रमाणे:

१. सुप्रीम कोर्टाच्या एक ऑगस्ट २०२४ च्या निर्णयानुसार महाराष्ट्र सरकारने अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण लागू करावे.

२. न्यायमूर्ती अनंत बदर समितीला लवकरात लवकर आपला अहवाल देण्याविषयी आदेश द्यावेत आणि त्यावर आरक्षण उपवर्गीकरणाचा त्वरित निर्णय घेण्यात यावा.

३. जोपर्यंत अनंत बदर समितीचा निर्णय येत नाही व आरक्षण उपवर्गीकरणाची महाराष्ट्र सरकार घोषणा करत नाही तोपर्यंत महाराष्ट्रातील सर्व प्रकारची भरती प्रक्रिया स्थगित करण्यात यावी.

४. बनावट जात प्रमाणपत्र घेऊन मागासवर्गीयांच्या जागा लाटणाऱ्या बिगर अनुसूची जातीतील व्यक्तीला जन्मठेपेची शिक्षा देण्याविषयी चा कायदा करण्यात यावा.

५. सत्यशोधक अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे.

६. आर्टी या संस्थेला आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र स्वायत्त व सक्षम बनवून मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणास गती देण्यात यावी.

७. अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळास एक हजार कोटी भाग भांडवल देण्यात यावे व कर्ज वितरणातील जाचक अटी रद्द कराव्यात.

८. दलितांच्या न्याय हक्कांच्या संरक्षणासाठी अस्तित्वात आलेला ॲट्रॉसिटी ॲक्ट कायदा अधिक प्रभावी व कठोर करण्यात यावा.

९. महाराष्ट्र शासनाने स्वीकृत केलेल्या लहुजी साळवे अभ्यास आयोगातील शिफारशींची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी.

१०. दलितावरील अत्याचाराच्या घटना फास्टट्रॅक कोर्टामार्फत चालवण्यात याव्यात. आमच्या वरील मागण्या या महाराष्ट्रातील तमाम मातंग समाजाच्या मागण्या असून यावरती महाराष्ट्र सरकारने त्वरित निर्णय घ्यावा अन्यथा भविष्यामध्ये आणखी तीव्र आंदोलन छेडले जाईल याची दखल घ्यावी.

सहभागी संघटना प्रा. डॉ. माछिंद्र सकटे (दलित महासंघ), कॉ. गणपत भिसे (लाल सेना), सतीश कावडे (अण्णाभाऊ साठे क्रांती आंदोलन), अण्णा धगाटे (जेष्ठ साहित्यिक), शंकरभाऊ तडाखे (राष्ट्रीय लहुजी शक्ती सेना), रणधीर कांबळे (राज्य समन्वयक सकल मातंग समाज), संजय ठोकळ (मातंग क्रांती मोर्चा) संतोष पवार, अंगद वाघमारे, अशोक ससाणे, अशोक लोखंडे, परिमल कांबळे, विलास साबळे, संदीप मानकर, बालाजी घुमाडे, प्रकाश वैराळ, वसंतराव सकट, विजय चांदणे, अनिल हातागळे, सुरेश बहिलम, राजकुमार शिंदे, सुनील मोटे, विष्णुपंत वैराळ, नामदेव साठे, संजय बोदडे, भुजंग कांबळे, जितेंद्र गायकवाड, सागर कांबळे, दत्ता तांबे, प्रकाश बनपट्टे, उत्तम गोरे, सारजा भालेराव, परमेश्वर बंडेवार, अशोक उबाळे, विकास गोरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पुरोगामी महाराष्ट्राच्या वैचारिक विकासाची अधोगती

शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा महाराष्ट्र म्हणून सगळीकडेच डंका वाजवला जातो. परंतु हा डंका केवळ भाषणापुरता आणि बोलण्यापुरता असल्याचे सामाजिक परिस्थितीवरून दिसून येते. कारण पुरोगामी महाराष्ट्र घडवण्यात अनेक थोर शुर वीर, विचारवंत, महामानव, समाज सुधारक, शेतकरी, कष्टकरी यासह अनेकांनी आपला जीवन समर्पित केले आहे. पुरोगामी महाराष्ट्र घडवण्यासाठी ज्यांनी ज्यांनी आपले आयुष्य झिजवले आणि विकसनशील महाराष्ट्र आणि पुरोगामी महाराष्ट्र घडवला ते जर आज असते तर या पुरोगामी महाराष्ट्राच्या विकासातील वैचारिक अधोगती पाहून नक्कीच त्यांनाही खेद वाटला असता. महाराष्ट्रातील सुशिक्षित पिढीची वाचन संस्कृती लोप पावत चालल्याने सत्याचा उलगडा होण्यास त्यांना अडचण होत आहे. कारण सोशल मिडियावरील अभासी ज्ञानावर त्यांचा विश्वास वाढत आहे नव्हे तो दृढ होत आहे. त्यामुळे सत्य आणि असत्यातील फरक ओळखण्यात ते कदाचित अपयशही ठरत आहेत म्हणूनच की काय



खर्याला खर म्हणार्यांची कमतरता या पुरोगामी महाराष्ट्रात भासत आहे.

महिलावरील अत्याचाराचेही वाढते प्रमाण पुरोगामी महाराष्ट्राला मान शरमेनी खाली घालायला लावणारी आहे. २०१९ ते जून २०२४ पर्यंत राज्यातील १८ वर्षांखालील २० हजार १३६ मुलींवर बलात्कार व लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक माहिती काही दिवासापुर्वी एका दैनिकात प्रकाशित झाली. याच पाच वर्षांच्या काळात १८ वर्षांवरील १२ हजार ८३२ महिलांवर बलात्कार झाला आहे. 'क्राईम इन इंडिया'चे २०१९ ते २०२२ पर्यंतचे अहवाल आणि २०२३ ते जून २०२४ पुणे 'सीआयडी'च्या माहितीच्या आधारे राज्याच्या गृह विभागाने ही आकडेवारी एकत्रित केली आहे. मागच्या दोन वर्षांत तर प्रत्येक वर्षी चार हजारपेक्षा जास्त बालिकांवर बलात्कार झाला आहे. साधारण तेच प्रमाण चालू वर्षात देखील असून जून २०२४ पर्यंत २१४७ बालिकांवर बलात्कार किंवा लैंगिक अत्याचार झाल्याची माहिती गृह विभागातील वरिष्ठ सूत्रांनी दिल्याची माहितीही एका दैनिकात आली होती. बीड आणि सांगलीत ऊसतोड कामगार महिलांच्या न कळत गर्भाशये काढली जाण्याची प्रकरणे समोर आली आहे.



दिनकर जाधव
मो.७०८३२७२७७७

महाराष्ट्रात वाढत चाललेली राक्षसी वृत्ती ही महाराष्ट्राच्या वैचारिक विकासाला लागलेले ग्रहण म्हणावे लागेल. ही राक्षसी वृत्ती सरकार हाणून पाडण्यात अपयशी ठरत आहे. महाराष्ट्रात राजकीय आणि प्रशासकीय व्यक्तींच्या हातून होत असलेला भ्रष्टाचार तर जणूकाही त्यांचा जन्मसिद्ध हक्कच आहे की काय ? असेच जनतेला भासू लागले आहे.

महाराष्ट्राच्या बहुतांश मुख्यमंत्र्यांनी, मुख्यत्वे छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र अशीच ओळख या राज्याची ठेवली आहे. आज महाराष्ट्राची सामाजिक, आर्थिक, राजकीय विचारसरणी मोठ्या प्रमाणात बदलत आहे. १९९१ नंतर भारताचे अर्थकारण बदलले आणि त्याने सामाजिक तसेच राजकीय सांस्कृतिक बदल आणले. हे बदल महाराष्ट्रासाठी अनैसर्गिक असून महाराष्ट्राची विचारसरणीचे पुरोगामित्व अबाधित ठेवल्यास महाराष्ट्राची ओळख कायम राहू शकेल.

# अंजनवती पोष्टमास्तरने भाऊसाहेब शेटेने केला ५० लाखांचा घोटाळा

## बनावट पासबुकद्वारे अपहार चौसाळा उपडाकघरात पैसे जमा केलेच नाहीत; ग्रामस्थ संतप्त

अंजनवती | प्रतिनिधी

बीड तालुक्यातील अंजनवती गावातील पोष्ट मास्तर भाऊसाहेब शिवलिंग शेटे यांनी बनावट पासबुक तयार करून चौसाळा उप डाकघरातील कार्यालयात पैसे जमा न करता जवळपास ५० लाख रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप अंजनवती आणि घारगाव येथील ग्रामस्थांनी केला असुन यामध्ये रॅकेट कार्यरत असुन चौसाळा डाकघरातील अधिकारी कर्मचाऱ्यांसह सर्वांचीच सखोल चौकशी करून गोरगरिबांच्या खात्यावरील पैसे परत करावेत अशी मागणी सरपंच कैलास येडे,रेवण येडे, वैभव येडे, सुधीर सोनवणे, महादेव माळी,बाळु शिंदे, मारोती वारकरी, बन्सी शिंदे आदींनी केली आहे.



### चौसाळा डाकघरातील अधिकारी व कर्मचारी यांची सखोल चौकशी करून खातेदारानचे पैसे परत करा : येडे

केंद्र शासनाची योजना असल्याने याची विश्वासाहर्ता होती म्हणून गोर गरीब शेतमजुर यांनी पोष्टात पैसे जमा केले.२ वर्षांपूर्वी भाऊसाहेब शेटे पोष्ट मास्तर म्हणुन आल्यावर गोंधळ सुरू झाला. एका माणसाचे काम नसुन चौसाळा डाकघरातील अधिकारी व कर्मचारी यांचा सुद्धा यामध्ये सहभाग असल्याचा संशय असुन सखोल चौकशी करून कारवाई करावी आणि खातेदारांचे पैसे परत करावेत अशी मागणी सरपंच कैलास येडे यांनी केली आहे.

### मेंढ्या राखुन जमा केलेले दीड लाख रुपये गायब : अनुसया कोंडीबा कर्डीले

मालक वारल्यानंतर, मेंढ्या सांभाळणं होईना मग त्या विकुन दीड लाख रुपये पोस्टात टाकले. बटईने दिलेल्या जमिनीतुन मिळणाऱ्या पैशातून पोटापाण्याचं भागतं. काल गावात कालवा झाला तेव्हा कळलं पोष्ट मास्तरनं घोटाळा केलाय. आता आम्ही काय करावं असा प्रश्न ७५ वर्षीय अनुसया कोंडिबा कर्डुले हताश होऊन विचारताहेत. अशाच प्रकारे फसवणूक झाल्याचे पपिता प्रभाकर थोरात, मुक्ताबाई श्यामराव सोनावणे यांनी सांगितले.

### खातेदारांनी पुरावे द्यावे; चौकशी करून कारवाई करू : निरीक्षक जाकोरे

चौसाळा डाकघराचे निरीक्षक जाकोरे यांनी अंजनवती गावात ग्रामस्थांशी चर्चा करत. खातेदारांनी त्यांच्याकडे असलेल्या खात्याचे पुरावे द्या पुढील कारवाई करण्यात येईल तसेच पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात येणार आहे, असे जाकोरे यांनी सांगितले.


# विद्यार्थिनींने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मिळवलं पारितोषिक

बीड | प्रतिनिधी



केज तालुक्यातील दहिफळ वड माऊली येथील शाम वरिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी श्रीमती धस मोहिनी हिने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत भाग घेऊन उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले आहे. याविषयी सविस्तर माहिती अशी की शाम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाची स्थापना शिक्षण महर्षी शामराव गदळे गुरुजी यांनी केलेली आहे त्यांच्या काळापासून ते आजपर्यंत या महाविद्यालयाने व विद्यालयाने नाव जिल्हाभरात दर्जात्मकरित्या टिकवले आहे.

या महाविद्यालयाचे विद्यार्थी नेहमीच कोणत्या ना कोणत्या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन विजय संपादन करतात मग त्यामध्ये स्पर्धा परीक्षा असतील, विद्यापीठाचा युवक महोत्सव असेल किंवा जिल्हा, विभाग, राज्य स्तरावरील क्रीडा स्पर्धा असते या सर्व स्पर्धेमध्ये सहभागी होऊन आपल्या गुणाची चुणूक दाखवून आपल्या आई वडिलांचे व महाविद्यालयाचे नाव उज्वल करतात अशाच पैकी बीड येथे नवगण शिक्षण संस्था राजुरी चे सचिव डॉक्टर भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्ताने के एस के कॉलेज बीड ने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्या स्पर्धेमध्ये मोहिनी या विद्यार्थिनीने भाग घेऊन आपल्या वक्तृत्व शैलीच्या जोरावर उत्तेजनात्मक दोन पैकी एक पारितोषिक मिळवलेले आहे. या तिच्या गुणाबद्दल आणि यशाबद्दल डॉक्टर शशिकांत शामराव दहिफळकर संस्थाध्यक्ष, सचिव शरद शामराव गदळे, डॉक्टर शालिनी कराड कोषाध्यक्ष, डॉक्टर अनिता शशिकांत गदळे सदस्य, श्याम कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य जयश्री गदळे, श्याम वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अनंत मुंडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य राजेश गंधगे, महाविद्यालय विकास मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब डोईफोडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉक्टर शांता जाधवर, ज्येष्ठ शिक्षक ठोंबरे बीबी, श्री पाळवदे एन ये, श्री भोसले पी एस श्रीमती कुलकर्णी मॅडम व शाम विद्यालय शाम कनिष्ठ महाविद्यालय आणि श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे व तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत अशी माहिती सरपंच प्राध्यापक तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी दिली आहे.




आमदार विजयसिंह पंडित यांनी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल गेवराई सदस्यपदी निवड झाल्याबद्दल संतोषजी सुतार यांचा सत्कार केला.

# प्रकाश सोळंके यांना मंत्रीपदाची संधी द्यावी : शिनगारे, जगताप, चव्हाण

धारूर | प्रतिनिधी

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका झाल्यानंतर बीड जिल्ह्यातून प्रकाश सोळंके यांना मंत्रिपद मिळेल आणि त्यांच्या प्रदीर्घ राजकारणाचा जिल्ह्यालाच नव्हे तर राज्याला फायदा होईल ही अपेक्षा होती. परंतु तीन पक्षांमध्ये सरकार स्थापन झालेले असल्याने सोळंके यांना मंत्रिपदावर संधी मिळू शकली नव्हती. आता जिल्ह्यातीलच रिक्त झालेल्या मंत्रिपदावर प्रकाश सोळंके यांची वर्णी लावावी आणि त्यांना न्याय द्यावा अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष अमोल जगताप, शहराध्यक्ष नितीन शिनगारे, गौतम चव्हाण यांनी केली आहे.




तीन महिन्यापूर्वी महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका संपन्न झाल्या. त्यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी यंदा प्रकाश सोळंके यांना न्याय दिला जाईल असे सांगितले होते. परंतु महाराष्ट्रात तीन पक्षांचे महायुती सरकार स्थापन झाले. मंत्रीपद विभागली गेली त्यामुळे सोळंके यांना न्याय मिळू शकला नव्हता. आता जिल्ह्यातीलच रिक्त झालेल्या मंत्रिपदावर आ.प्रकाश सोळंके यांना संधी द्यावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.प्रकाश सोळंके यांच्या प्रदीर्घ राजकारणाचा विधिमंडळातील कामकाजाचा अनुभव लक्षात घेता प्रकाश सोळंके हेच या मंत्रिपदाचे खरे दावेदार आहेत. त्यांना राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी न्याय द्यावा अशी मागणी धारूर राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष अमोल जगताप, शहराध्यक्ष नितीन शिनगारे, गौतम चव्हाण यांनी केली आहे.

# ॲग्री स्टॅकसाठी शेतकऱ्यांनी नोंदणी करावी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना भेटी देऊन माहिती दिली

धारूर | प्रतिनिधी

शेतकऱ्यांना सर्व कामासाठी एकत्रीत सुविधा उपलब्ध व्हावी या साठी ॲग्री स्टॅक मोहीम राबवण्यात येत असून भोपा, देवदहीफळ, मोहखेड आदी ठिकाणी जाऊन योजनेची सविस्तर माहीती प्रभारी तहसीलदार सुरेश पाळवदे यांनी देऊन या योजनेत नोंदनी करून लाभ घ्यावा असे आवाहन प्रभारी तहसीलदार सुरेश पाळवदे यांनी शेतकऱ्यांना केले आहे.




शेतकऱ्यांची सर्व गैरसोय दुर व्हावी व सर्व सुविधा त्यांना एका क्षणात मिळाव्यात त्यांचे वेळेचा अपव्यय टाळण्या साठी शासन ग्रीस्टॅकयोजना राबवत असून फार्मर आयडी व फार्म आयडी काढणे या साठी बंधन कारक केले असून सी एस सी सेंटर वर यांची नोंद केली जात आहे याचे कॅम्प मध्ये काम चालू आहे देवदहीफळ, भोपा मोहखेड आदी ठिकाणी प्रभारी तहसीलदार सुरेश पाळवदे यांनी भेटी देऊन पहाणी केली व शेतकऱ्यांना माहीती सांगीतली. सी एस सी केंद्र मोहखेड येथे प्रभारी तहसीलदार सुरेश पाळवदे यांनी शेतकऱ्यांना एकत्रित करून या योजनेचे शेतकऱ्यांना होणारे फायदे सांगून तात्काळ नोंदणी करण्याचे अवाहण केले. यावेळी मंडळ अधिकारी सोपान वाघमारे तलाठी भद्रे व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# मस्साजोग ते बीड सद्भावना पद यात्रेमध्ये सहभागी होणार : नितीन सोनवणे

बीड | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये विषमतेचे वीस पेरून गढूळ केल्या जात असलेल्या या सामाजिक परिस्थितीमध्ये सर्वसामान्य निर्दोष माणूस भरडला जात आहे. जाती-जातीमध्ये वाढत चाललेली दोष भावना आणि त्यातूनच निर्माण होणारे दुष्परिणाम अराजकता कायदा सुव्यतेचे प्रश्न गुन्हेगारी प्रवृत्तीला मिळणारे बळ या सर्व सामाजिक संतुलन नष्ट करणाऱ्या प्रवृत्ती पासून समाजाला व पुढच्या पिढीला वाचवण्यासाठी राष्ट्रीय इंदिरा कॉंग्रेस पक्षाच्या व काही सामाजिक संघटना इतर काही पक्ष या सर्वांच्या वतीने



पुढाकार घेण्यात आला. असून मस्साजोग, केज येथून बीड पर्यंत दिनांक ०८/०३/२०२५ ते दिनांक ०९/०३/२०२५ रोजी काढण्यात येणाऱ्या सद्भावना पद यात्रेमध्ये कॉंग्रेस व इतर मित्र पक्षाचे पदाधिकारी तसेच ऑल इंडिया पँथर सेनेचे बीड जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते पदाधिकारी असंख्य तरुण व समाज बांधव या पद यात्रेमध्ये सहभागी होणार आहेत.

समाजामध्ये न्याय न्यायव्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी सद्भावना जागृत राहणे गरजेचे आहे. सामाजिक सलोखा एक्य वाढविण्यासाठी सद्भावना यात्रेचे आयोजन उपयुक्त ठरू शकते तरी आयोजकांनी सद्भावना यात्रेसारखा स्तुप्त उपक्रम हाती घेऊन दिलेल्या आमंत्रणचे आभार मानून सद्भावना यात्रेसारख्या स्तुत्य उपक्रम हाती घेतल्याबद्दल सर्व आयोजकांचे आभार संघटनेच्या वतीने मानतो.

आम्ही सर्व बीड जिल्ह्यातील पदाधिकारी तसेच सर्व कार्यकर्ते समाज बांधव सद्भावनेचे खरे अनुयायी म्हणून मोठ्या संख्येने सद्भावना यात्रेमध्ये सहभागी होणारा आहोत. तरी बीड जिल्ह्यातील समस्त समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सद्भावना यात्रेमध्ये सहभागी व्हावे असे नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना बीड जिल्ह्याच्या वतीने विनम्र आव्हान करण्यात येत आहे.

# शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी कामाला लागावे

बीड | प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशाने व युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे, शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायक राऊत, शिवसेना मराठवाडा संपर्क नेते सुनील प्रभू, मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूरकर, शिवसेनेचे सह संपर्क प्रमुख तथा माजी मंत्री बदामराव पंडित, सहसंपर्क प्रमुख लक्षराज सानप, सहसंपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे, माजलगाव विधानसभा प्रमुख महादेव आंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव अध्यक्षतेखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली आज वडवणी शहरातील जय मल्हार हॉटेल येथे माजलगाव विधानसभा मतदारसंघातील माजलगाव, वडवणी, धारूर तीन्ही तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

यावेळी बोलताना जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव व जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते म्हणाले की, आपण सर्व उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांचे शिवसैनिक आहोत, त्यांच्या विचारांचे शिवसैनिक आहेत यामुळे आपापसात कोणतेही गट तट न मानता पक्षसंघटना वाढीसाठी काम करत रहा आपण केलेल्या कामाची दखल नक्कीच



शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे घेतील व येणाऱ्या, नगरपंचायत नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांमध्ये आपणास आपण केलेल्या कामाची पोचपावती देतील.

आता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत मोठ्या नेत्यांच्या खासदारकीच्या आमदारकीच्या निवडणुका संपल्या येणाऱ्या निवडणुका या तुमच्या आमच्या सर्वांच्या आहेत उद्याची जिल्हा परिषद निवडणूक पंचायत समिती निवडणूक, नगरपंचायत निवडणूक आहेत येथे आपल्यापैकीच कुणीतरी पंचायत समिती सदस्य झाला पाहिजे जिल्हा परिषद सदस्य झाला पाहिजे कुणीतरी नगर परिषद चा सदस्य झाला पाहिजे त्याच्यासाठी आमची ताकद तुमच्या पाठीमागे आहे म्हणून येथे जमलेल्या सर्व उपजिल्हाप्रमुखांना, तालुकापमुखांना विनंती करतो कि आपल्या कार्यक्षेत्रातील जे रिक्त पदे असतील त्या साठी नावे देण्यात यावीत आम्ही दिलेल्या नावांची छाननी करून येत्या वीस दिवसांत पदे भरून घेऊ म्हणजे पक्षसंघटना हि वाढेल व येणाऱ्या निवडणूकांमध्ये आपल्याला जास्तीत जास्त यश मिळेल.

आढावा बैठकीच्या निमित्ताने शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी निष्ठावंत शिवसैनिकांना शिवबंधन बांधले. यावेळी सोबत महिला जिल्हा संघटीका प्रमिलाताई माळी, शिवसेनेचे जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, जिल्हा सचिव युवराज मामा शिंदे, वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे, धारूर तालुका प्रमुख बाबासाहेब सराफ, माजलगाव शहर प्रमुख दत्ताजी रांजवण, माजलगाव महिला तालुका प्रमुख शेंडगे ताई, युवासेनेचे उपजिल्हा युवाधिकारी वचिष्टजी शेंडगे, युवासेनेचे तालुका युवा अधिकारी नवनाथजी मोरे, धारूर माजी तालुका प्रमुख विनायकजी ढगे, बाबासाहेबजी राऊत, जिल्हा संघटक ज्ञानेश्वर महाराज टाकणकर, दासु पाटील बादाडे, मुन्ना शेठ पवार, ज्येष्ठ शिवसैनिक बंडू मामा जाधव, युवा नेते एकनाथजी पवार सह शिवसेनेचे सर्व आजी माजी पदाधिकारी ज्येष्ठ शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जयश्री विलास विधाते यांना जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर

बीड | प्रतिनिधी

राजकीय सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य आणि आपल्या वार्डाचा नेतृत्व विकास करणाऱ्या कर्तव्यदक्ष नगरसेविका म्हणून ज्यांचा सर्वत्र परिचय आहे अशा सौ जयश्री विलास विधाते यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक महिला दिनी देण्यात येणाऱ्या जागतिक स्तरावरील स्त्री रत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



सौ जयश्री विलास विधाते या २०११ पासून आज पर्यंत बीड नगरपालिकेच्या आदर्श नगरसेविका आहेत. स्वच्छता व आरोग्य सभापती पद तसेच दोन वेळा महिला व बालकल्याण सभापती पद त्यांनी केवळ भूषवले नाही तर त्या पदाला खऱ्या अर्थाने न्याय दिला. मराठा क्रांती मोर्चात सक्रिय सहभाग घेणाऱ्या, गोरगरीब गरजूवंत महिला व मुलींना १९९६ पासून व्यावसायिक मोफत प्रशिक्षण देऊन त्यांना शिका आणि कमवा ही संकल्पना राबवणाऱ्या, त्यांच्या हाताला काम आणि कामाला दाम मिळून देणाऱ्या, धार्मिक सामाजिक प्रबोधन पर कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन करणाऱ्या, गरजवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच मोफत पुस्तके वाटप करण्याची संकल्पना राबवणाऱ्या सातत्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करणाऱ्या, वैद्यकीय मदतीसाठी सातत्याने पुढाकार घेणाऱ्या, एवढेच नव्हे तर पशु पक्षांना पाणी चारा आणि निवारा मेळावा म्हणून सातत्याने धडपड करणाऱ्या, स्त्रीशक्ती प्रतिष्ठानच्या माध्यमातून आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांच्या आधार बनण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने केला.

विशेष बाब म्हणजे नगरपालिकेमध्ये ठराव घेऊन कुंकवापलीकडची संक्रात ही संकल्पना त्यांनी प्रत्यक्षात राबवली. दारूबंदीसाठी त्यांचा पुढाकार कायम चर्चेत राहिला. वार्डाचा नेत्रदीपक विकास करत एक कर्तव्यदक्ष नगरसेविका असल्याचं त्यांनी सातत्याने सिद्ध केलं. त्यांच्या या सर्वांगीण कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार त्यांना जाहीर झाल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# लाडक्या बहिणी तुपाशी, निराधार मात्र उपाशी!

## गेवराई तालुक्यातील निराधारांचे दोन महिन्यांचे मानधन रखडले; लाभार्थी मानधनाच्या प्रतीक्षेत? लाभार्थ्यांची फरफट; आर्थिक विवंचनेचा करतायेत सामना

गेवराई | प्रतिनिधी

विधवा, दिव्यांग, परितक्त्या, निराधार, घटस्फोटित, वयोवृद्ध घटकांना शासनातर्फे जीवनज्ञापन करण्यासाठी मासिक मानधन दिले जाते. परंतु,दोन महिन्यांपासून गेवराई तालुक्यातील गरजू लाभार्थी मानधनाच्या प्रतीक्षेत आर्थिक विवंचनेचा सामना करीत आहेत. या महिन्यात सणासुदीचे दिवस असताना त्यांना मात्र दोनवेळच्या जेवणासाठी हाल सोसावे लागत आहेत. राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन व राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य, वयोवृद्ध मानधन आदी योजना समाजातील वंचित घटकांसाठी राबविण्यात येतात.





या गरजू व्यक्तींना नियमित मानधन मिळावे, असे अपेक्षित आहे. परंतु, ते बहुधा एकत्रच मिळते. दोन महिन्यांपासून या लाभार्थ्यांचे मानधन अद्याप मिळाले नाही. शासनाने अनुदान जमा न केल्याने ही स्थिती उद्भवली असून, यामुळे मानधनावर अवलंबून असणाऱ्या गरजूंची आर्थिक ओढाताण सुरू आहे. श्रावणबाळ योजनेचे अधिकाधिक लाभार्थी वृद्ध आहेत. ६५ वर्षांवरील या वृद्धांना या वयात औषधपाण्याची गरज असते. पेन्शन न मिळाल्याने त्यांचा दवाखाना थांबला आहे. याशिवाय दैनंदिन खर्चाचीही अडचण झाली आहे. पेन्शन कधी येणार, याची विचारणा करण्यासाठी लाभार्थी तहसील कार्यालयात येरझाऱ्या घालत आहेत. लाभार्थ्यांच्या हाती पैसाच नसल्याने सण साजरे करणे दूर सध्या त्यांना रोज पोट भरण्याची भ्रांत पडली आहे. विशेष सहाय्य योजनेंतर्गत मानधन सुरू ठेवण्यासाठी योजनेच्या लाभार्थ्यांना दरवर्षी शासनाने हयातीच्या दाखल्याबरोबरच उत्पन्नाचा दाखला सादर करावा लागतो. अपंग, वृद्ध, निराधार लाभार्थ्यांनी मोठा मनस्ताप सहन करून या अटींची पूर्ती केली. गरीब, निराधार, वृद्ध, विधवा व परितक्त्या, गरीब लाभार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागला. परंतु, तरीही त्यांना नियमित मानधन देण्यात आडकाठी? असा प्रश्न लाभार्थ्यांनी केला आहे.

### लिपिकाच्या मनमानी कारभारामुळे लाभार्थी त्रस्त!

गेवराई तहसील कार्यालयात नूतन लाभार्थ्यांची यादी प्रकाशित करण्यात आली. यामध्ये नवनिर्वाचित लाभार्थ्यांनी आपले कागदपत्रे जमा करण्यासाठीच आलें होतें मात्र निराधार कार्यालयाच्या आवारात लाभार्थ्यांना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची वाट बघत तासन-तास बसावे लागले. सातत्याने लाभार्थ्यांना उडवा उडवी चे उत्तरे तेथील लिपिक यांच्याकडून दिले जाते परंतु गेल्या काही दिवसापासून या विभागात बंद दाराच्या आत नेमकं काय चाललंय यांची तपासणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी करावी, अशी मागणी होत आहे.

## मिरकळा ग्रामस्थांची भगवानगडाला ६७ लाख रुपये देणगी जाहीर




भगवानगड | प्रतिनिधी

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे मिरकळा (ता.गेवराई जि.बीड) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ६७ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.



## वडवणीत ट्रेडर्सला भीषण आग

वडवणी | प्रतिनिधी

काल सकाळी वडवणी शहरातील चिंचवण रोडवर नामांकित असलेल्या बांधकाम साहित्याचे विशाल वीलास पतंगे ट्रेडर्सला काल सकाळी ७ वा सुमारास अचानक भीषण आग लागल्याने कोट्यावधींचे नुस्कान झाले.तर दुपारी १२.३० वाजेपर्यंत आज पूर्णपणे आटोक्यात आलेली नाही सदरील आग विझवण्यासाठी अग्निशामकच्या पाच गाड्यांना पाचारण करण्यात आले होते.तर या आगेत कोट्यावधी रुपयाचे नुकसान झाले असावे असा अंदाज व्यक्त केला जात आहे. तर वडवणी.न.प तील स्वतंत्र अग्निशामकची गाडी असुन देखील त्या गाडीला घटनास्थळी येण्यासाठी जवळपास दोन तास उशीर लागला. परंतु आग लागल्याले पतंगे ट्रेडर्स शेजारी असलेले दुकान वाचवण्यासाठी वडवणी शहरातील नागरिकांनी आपला जीव धोक्यात घालून दुकानात असलेले सामान बाहेर काढण्यास मदत केली.

## आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली बीड एमआयडीसीबाबत मंत्री ना.उदय सामंतांची भेट

बीड | प्रतिनिधी

बीडच्या एमआयडीचा विकास व्हावा याकरिता गेल्या अनेक दिवसांपासून आ.संदीप क्षीरसागर शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत आहेत. त्यातच गुरूवारी (दि.६) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधीमंडळात महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांची भेट घेतली. बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास व्हावा याकरिता बीड शहरात स्थित असलेल्या औद्योगिक वसाहतीचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून त्याठिकाणी मोठमोठे उद्योग येतील आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल तसेच आर्थिक स्थिती सुधारेल. ही बाब लक्षात घेऊन आ.संदी प क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून बीडच्या एमाआयडीसीच्या विकासासाठी पाठपुरावा करत आहेत. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी काही दिवसांपूर्वीच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची भेट घेतली होती.



तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, प्रादेशिक अधिकारी आदी वरिष्ठ अधिकार्यांसमवेतही बैठका घेतल्या होत्या. आता पुन्हा यासंदर्भात, मुंबई येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांची भेट घेतली आहे. दरम्यान याविषयी ना.सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच सविस्तर बैठक लावण्याचे सांगितले आहे.

## शिरूरमधील सर्व शेतरस्ते महसुल अभिलेखात नोंद होणार : घोळवे

शिरूर | प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांना सुस्थितीत शेतरस्ते नसणे हि प्रमुख समस्या विचारात घेता. शिवराम राऊत यांच्याकडून अनेक वर्षापासुन या बाबतीत संघर्ष व पाठपुरावा चालू असतो. सद्यस्थितीत वापरातील, शेतरस्ते, पायवाट, गाडीरस्ते, नंबरबांधरस्ते, सर्वे नं. रस्ते, वस्ती जोड रस्ते, शीव रस्ते हे वापरात अनेक वर्षापासुन असतात परंतू त्यांची शासनाच्या महसुल अथवा भूमी अभिलेख मधील प्रमाणित नकाशात नोंदच नसल्याने अनेक समस्या निर्माण होतात. यामधील प्रमाणित दस्तावेज नसल्याने या रस्त्याचे मजबुतीकरण, पांदन रस्ते योजना, खडीकरण, मजबुतीकरण व विविध योजनेच्या लाभ देता येत नाही. तसेच काही खोडकर शेतकरी रस्ता आडवणे, अतिक्रमण करणे, बांधरेटणे, रस्ते विकास कामात संमती न देणे, यामुळे शेती वहिवाटीस अडथळा निर्माण होऊन शेतकऱ्यांतील संघर्ष विकोपाला जातो. काही राजकिय हेवेदावे, जूण्या भांडणाच्या कुरापती मधून शेतकऱ्यांना वहिवाटीस व येण्या- जाण्यास मज्जाव करणे यामुळे महसुली प्रशासनाने किमान हिवरसिंगा सज्जा अंतर्गत सद्यस्थितीत वापरातील सर्व प्रकारच्या रस्ते प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून त्यांचा पंचनामा करून त्या-त्या गट नं., सर्वे नं.च्या इतर हक्कात सदरील रस्ता प्रकार, त्यांची लांबी-रुंदी यांच्या नोंदी घ्यावी व भूमी अभिलेख कार्यालयातील गाव नकाशात प्रमाणित करण्यासाठी सहकार्य करावे यासाठी शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने अध्यक्ष शिवराम राऊत, उपाध्यक्ष माऊली शिंदे यांनी शिरूर तालुक्याचे तहसिलदार घोळवे यांची भेट घेऊन या विषयी मागणी करताच. संबधित यंत्रणेला सुचित करत पूर्ण तालुक्यातील मंडळाधिकारी, तलाठी व गाव रस्ता समितीच्या माध्यमातुन प्रचलित वहिवाटीत असणारे सद्यस्थितीला रस्ते पंचनामा करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. लवकरच या संबंधी कार्यवाही पुर्ण करून हिवरसिंगा सह तालुक्यातील प्रत्येक सज्जातील रस्ते नोंद करण्याचे तहसिलदार घोळवे यांनी अश्वासित केले.

## निवडणुकीत पडलो असतो तरी जनतेच्या मनातून पडलो नाही : बदामराव पंडित

गेवराई | प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत माझा पराभव झाला असला तरी, जनतेच्या मनातून मी पडलेलो नाही. याचा मला अभिमान आहे. गोरगरीब आणि सामान्य लोकांचे आशीर्वाद कायम माझ्या पाठीमागे आहेत. म्हणूनच ७३ हजारांपेक्षा अधिक मते मला मिळाली. सर्वांसाठी मी खंबीरपणे उभा आहे. कोणतेही काम घेऊन या, ते करण्यासाठी तत्पर आहे. मी खचलो नाही, खचणार नाही. तुम्हीही कोणी खचू नका. नव्या ताकतीने कामाला लागा. येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर पालिका निवडणुकीत आपल्या विचाराचे उमेदवार निवडून द्या असे आवाहन शिवसेनेचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.

गेवराई तालुक्यातील पांढरी येथे दिनांक एक मार्च २०२५ रोजी एक कोटी ६१ लक्ष २५ हजार रुपयांच्या विविध योजना अंतर्गत कामाचा शुभारंभ प्रसंगी उद्घाटक म्हणून बदामराव पंडित बोलत होते. याप्रसंगी माजी सभापती पंढरीनाथ लगड, माजी जि प सदस्य युवराज डोंगरे, युवा नेते रोहित पंडित, युवा नेते यशराज पंडित, माजी सभापती गीताराम डोंगरे, गोविंद जोशी, राजाभाऊ खिस्ते, सुंदर तिवारी, राजाभाऊ विटेकर, केशव तिवारी, सरपंच भास्करराव हातागळे, सरपंच सर्जेराव कांबळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, नारायण गाडे, भाऊसाहेब माखले, भागवत नाटकर, बंटी भामरे, सरपंच परशुराम मिंड, संतोष हातागळे, खदिरभाई आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी पोलीस विभागात निवड झालेल्या विश्वजीत कांबळे यांचा सत्कार बदामराव पंडित यांनी केला.



पुढे बोलताना ते म्हणाले की, विधानसभेत लागलेल्या निकालाने राज्यातले मतदार अचंबी झाले आहे जे निवडून आले त्यांनाही धक्के बसले आहेत. त्यामुळेच गेवराई मतदार संघसह राज्यातल्या बहुतांश मतदारसंघात जल्लोष आणि आनंद साजरा करताना मतदार दिसले नाहीत. मी प्रामाणिकपणे गोरगरिबांची आणि गेवराई मतदारसंघातल्या लोकांची कामे करत आलेलो आहे. या पुढच्या काळातही त्याच पद्धतीने कामे करत राहणार आहे. निवडणुकीत आपण पडलो असलो तरी जनतेच्या मनातून पडलेलो नाहीत त्यामुळे कोणी खचून जायचं नाही. ताकतीने कामाला लागा. आलेल्या प्रत्येक माणसाचं काम करा. ज्यांची कामे तुमच्याकडून होणार नाहीत ती माझ्यापर्यंत घेऊन या. गोरगरिबांचा माझ्यावर विश्वास असल्याने त्यांच्या आपल्याकडून अपेक्षा आहेत, असं सांगून कोणाचेही काम अडू देणार नाही. कोणी अडवण्याचा प्रयत्न केला तर माझ्याशी गाठ आहे, असा इशाराही बदामराव पंडित यांनी यावेळी दिला.

युवा नेते रोहित पंडित, पंढरीनाथ लगड, युवराज डोंगरे, नारायण गाडे, सुंदर तिवारी यांची समायोचित भाषणे झाली. याप्रसंगी शिवाजी आखरे, बाबुराव खांडे, राजेंद्र निकम, दिलीप पवार, पांडुरंग नलावडे, परमेश्वर परदेशी, किशोर इंगोले, बाबूप्रसाद परदेशी, संतराम निकम, सुभाष साखरे, विशाल आखरे, विष्णू कांबळे, दिलीप निकम, जीवन पांडे, सिताराम कांबळे, सचिन आखरे, भगवान राऊ आदींसह पंचक्रोशीतील अनेक गावचे आणि पांढरी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT